# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महावितरण

**कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,**
**४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.**
**दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११**

जा.क्र. : काऔसंवि /ब/२७३९४ दिनांक :०६/०७/२०१०

## परिपत्रक

विषय: कंपनीचे काम करीत असताना झालेल्या अपघाताच्या उपचारांच्या खर्चाची बिले प्रतिपूर्तीसाठी सांघिक कार्यालयास पाठविणे अगोदर क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची पूर्तता.

*************

सांघिक कार्यालय, मुंबई येथील कामगार औद्योगिक संबंध विभागात क्षेत्रीय कार्यालयाकडून कंपनीचे काम करीत असताना झालेल्या अपघाताच्या उपचाराच्या खर्चाची बिले प्रतीपूर्ती मंजूर करणेसाठी येतात. अशा प्रकारची अनेक बिले महाराष्ट्रातील सर्वच क्षेत्रीय कार्यालयाकडून येत राहतात. या कार्यालयात आलेल्या अपघाताच्या प्रकरणावरुन सकृत दर्शनी असे दिसते की, क्षेत्रीय कार्यालय अशा प्रकारची प्रकरणे त्यांच्या कार्यालयात सादर झाल्यानंतर कंपनीत अस्तित्वात असलेल्या तरतुदींचा विचार करुन प्राथमिक छाननी व आवश्यकत्या त्रुटींची संपूर्ण पूर्तता न करताच बरीच प्रकरणे तशीच सांघिक कार्यालयास पाठवून दिलेली आढळतात. अशा प्रकारची आलेली प्रकरणे या कार्यालयात पूर्णपणे छाननी करावी लागतात. अशा छाननीत अनेत त्रुटी आढळून येतात. अशा त्रुटींची पूर्तता करण्यासाठी प्रकरण संबंधित कार्यालयास परत पाठवावे लागते. असे असले तरी क्षेत्रीय कार्यालय सर्वच त्रुटींची संपूर्ण पूर्तता न करता अर्धवट पूर्तता केलेली प्रकरणे या कार्यालयास परत पाठवते. यामुळे संबंधित कर्मचारी आपले प्रकरण लवकरच मंजूर होईल या आशेवर राहतो व तो कामगार संघटनेच्या मार्फत स्वतःचे प्रकरण लवकर मंजूर होण्यासाठी प्रयत्न करतो. कर्मचाऱ्याने उपचारासाठी कर्ज काढून खर्च केलेला असल्याने त्याने वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती लवकर मिळण्यासाठी केलेले प्रयत्न रास्त असतात. परंतु प्रकरणाची संपूर्ण छाननी होऊन तरतुदीच्या चाकोरीत बसवून किंवा त्रुटींची पूर्ण पूर्तता करुन क्षेत्रीय कार्यालयाकडून पाठविली गेली नसल्याने केवळ पत्र व्यवहारामुळे प्रकरणे प्रलंबित राहतात. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असमाधान वाढते.

तेव्हा क्षेत्रीय कार्यालयांना विनंती करण्यात येते की, अशा प्रकारची कर्मचाऱ्यांच्या अपघाताची प्रकरणे पाठविताना सर्व प्रकरणाची त्यांच्याच कार्यालयात संपूर्ण छाननी करुन तसेच आवश्यकत्या त्रुटींची पूर्तता करुन कंपनीच्या तरतुदीच्या चाकोरीत जी प्रकरणे बसतात अशीच प्रकरणे मुख्य कार्यालयास पाठवावी, जेणेकरुन सदरची प्रकरणे विनाविलंब निकाली काढता येतील व अपघातग्रस्त कर्मचाऱ्यासही वेळीच वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळाल्याने दिलासा मिळेल.

...२-

यासाठी अशी प्रकरणे पाठविताना खालील बाबींचो पूर्तता कर्मचाऱ्याने पूर्ण केली आ काय याची प्रथम खात्री करुन घ्यावी. आणि अशा प्रकारे तरतुदीच्या चाकोरीत पूर्णपणे बसणा प्रकरणे या कार्यालयास वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्तीची मंजुरी करणेसाठी पाठवावीत.

१) अपघात अहवाल (Accident Report) Form XIII;

२) अपघात तपासणी अहवाल (Accident Investigation Report) Form 3;

३) साक्षीदारांचे जाबजबाब / पोलीस पंचनामा (in case of road accident);

४) प्रपत्र च (सा.आ.२० (क) मधील गंभीर आजार / शस्त्रक्रिया करावे लागणा आजाराकरिता वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबतची माहिती);

५) प्रपत्र छ -: (सा.आ.६२ दि. १०.०५.१९९५ मधील विहीत केलेल्या मुद्दांची पूर्तता);

६) प्रपत्र घ -: आजाराकरिता वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीबाबत (बिलाचा नमुना);

७) विशेष विकलांग रजेचा (Spl. Disability leave) कार्यालयीन आदेशासह प्रत जोडावी;

८) डॉक्टरांचे फिटनेस सर्टिफिकेट व कर्मचाऱ्याचा रुजू अहवाल;

९) मूळ बिले (म्हणजेच कॅशमेमो त्यावर पेशंट/डॉक्टरांचे नांव/स्वतः कर्मचाऱ्याने "पेड बाय मी" असे लिहून सही केलेले ) व ती रु. २०,००१ ते रु. ३०,०००/-पर्यंत शासकीय वैद्यकीय अधिकारी / जिल्हा शल्य चिकित्सक. यांनी प्रमाणित केलेली असावी. बिलांची प्रिस्क्रीप्शन सोबत जोडावीत.

१०) कर्मचाऱ्याने केलेल्या खर्चाची बीले / पावती तारखेनुसार प्रकरणास लावून खर्चाचा तपशील, तारीख, दुकानाचे नांव,झालेला खर्च दर्शविणाऱ्या तक्त्यात तयार करुन तक्ता प्रकरणा सोबत जोडावा.

११) खाजगी रुग्णलयात घेतलेले उपचार . शासकीय वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्याने घेतल्यास प्रमाणपत्र जोडावे किंवा सा.आ.२० चे सुधारपत्र ६१ दि. ०८.०५.१९९५ नुसार सहाय्यक अभियंता, तत्सम किंवा त्यावरील दर्जाच्या अधिका-यांचे शिफारसपत्र सोबत जोडावे;

१२) रु. ५०००/-च्या वर (कॅशमेमो व्यतिरिक्त) रेव्हेन्यू स्टॅप असावा;

१३) बिलांवर पेशंट, डॉक्टर यांच्या नांवाचा उल्लेख असावा.

१४) 'ON DUTY' दाखला परिपत्रक क्र. २६१९५ दि. ०८/०६/२००० नुसार सादर करावे;

१५) विशेष आहाराबाबत संबंधित डॉक्टरांचे मूळ प्रमाणपत्र जोडावे.

१६) मंडळाच्या वाहनाव्यतिरिक्त वैद्यकीय उपचारासाठी कर्मचा-याने ज्या इतर वाहनांचा वापर केला आहे, त्यासंबंधी नियंत्रण अधिकाऱ्याची परवानगी असावी.

१७) हमरस्त्यावरील अपघात (Road Accident) असल्यास विमा कंपनीकडे दावा दाखल केला आहे का? नसल्यास वाहन चालकावर अपघात नुकसानीचा दावा दाखल करुन अहवाल पाठवावा. अन्यथा कर्मचारी आर्थिक नुकसानिकरिता जबाबदार असेल.

१८) अपघाताच्या दिवसाची कामाची वेळ कळवावी. अपघाताच्या दिवशी काम कोणी व केव्हा दिले होते? सदर काम किती वाजता संपवून परत निघाले? रोडवर अपघात झाल्यामुळे प्रत्यक्ष कंपनीच्या कामाचा संबध येतो का? सदर अहवाल संबंधित कार्यकारी अभियंता यांचे सहीने पाठवावा. उपरोक्त त्रुटींची पूर्तता करुन प्रकरण पंधरा दिवसात या कार्यालयात पुढील उचित कार्यवाहीसाठी पाठवावे.

१९) दवाखान्याचे फायनल बील क्रमांक व दिनांक डॉ.च्या स्वाक्षरीसंहीत.

१९) दवाखान्याचे डिसचार्ज कार्ड.

२०) कर्मचाऱ्याचे उपचार संपल्यानंतर व कामगार रुजू झाल्यानंतर त्या दिवसापासून ३० (तीस) दिवसांत वैद्यकिय प्रतिपूर्तीचे प्रकरण सादर करावे. अन्यथा विलंबास क्षमापित करुन पाठवावे. प्रकरणास झालेल्या विलंबाची कारणे व त्यास जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल पाठवावा.

२२) मूळ वैद्यकीय प्रतिपूर्तीची प्रकरणे लेखा परीक्षण करुन पाठवावे.

क्षेत्रीय कार्यालयात सादर झालेल्या अपघाताच्या सर्व प्रकरणावर वरील सर्व बाबींची आपल्याकडील प्राथमिक छाननीत सर्व पूर्तता झाली आहे असे आढळून आल्याची खात्री झाल्यानंतर क्षेत्रीय कार्यालयाने क्षेत्रीय कार्यालयातून व सांघिक कार्यालयातील वित्त व लेखा (आस्थापना कामकाज) विभागातून परीक्षण करुन सदर प्रकरणे रु. २०,०००/- पर्यंत संबंधित मंडलाचे अधिक्षक अभियंते, रु. २०,००१/- ते रु.३०,०००/- पर्यंत संबंधित मुख्य अभियंता व रु.३०,००१/- पुढील रकमेची प्रकरणे सांघिक कार्यालयास मंजुरीसाठी पाठवावी. अशाने अपघातग्रस्त कर्मचाऱ्यांच्या अपघाताच्या खर्चासंबंधीची प्रकरणे विनाविलंब निकाली काढता येईल व संबंधित कर्मचाऱ्यास अपघाताच्या उपचारासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती वेळेवर मिळू शकेल.

किशोर पवार

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रति :
प्रेषण यादीप्रमाणे.